दैनिक
# गोकूळनिती
सर्व सामान्यांच्या हक्काचे व्यासपीठ
जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, व रायगड जिल्ह्यातून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे मराठी दैनिक...
Title Code - MAHMAR51249
RNI No. MAHMAR/2019/80191
Postal No. ABD/514/2022-2024
संपादक - अर्पण कमलकिशोर गोयल
छत्रपती संभाजीनगर ※ मंगळवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५
Email : gokulniti@gmail.com
※ वर्ष ६ वे ※ अंक ३७३ वा ※ पाने ४ ※ किंमत २ रू.

# जलजिवन मिशन कामांची तालुकानिहाय पाहणी करा-खा.भुमरे

## जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समिती बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- जलजिवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात प्रत्येक तालुकानिहाय झालेल्या कामांची पाहणी करावी,असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीचे अध्यक्ष खा. संदिपान भुमरे यांनी आज दिले.




जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण अर्थात दिशा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी खासदार संदिपान पाटील भुमरे हे होते. तसेच राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे, समितीचे सह अध्यक्ष राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड व लोकसभा सदस्य डॉ. कल्याण काळे तसेच विधान परिषद सदस्य आ. संजय केणेकर, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ.संजना जाधव, आ. अनुराधा चव्हाण,आ. विलास भुमरे, राज्य समितीचे सदस्य अजिनाथ धामणे, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे तसेच सर्व यंत्रणा प्रमुख आदी उपस्थित होते.

प्रारंभी दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तावर सदस्यांनी चर्चा केली. त्यात केंद्रशासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. त्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), स्वच्छ भारत मिशन शहरी, जलजीवन मिशन, एकीकृत बालविकास योजना, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण अभियान, समग्र शिक्षा अभियान, राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन, महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम अशा विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेच्या कामाची, घरकुल योजनेत होत असलेल्या कामांची, जलजीवन मिशन योजनेच्या कामांची पाहणी करण्यात यावी असे निर्देश खा. संदिपान भुमरे यांनी दिले.

# गतिमंद मुलांना कुकरच्या झाकणाने मारहाण; केअरटेकर, शिपायावर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- निवासी गतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना लाथाबुक्क्यांसह कुकरच्या झाकणाने मारहाण करण्यात आल्याची भयंकर घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात हा संतापजनक प्रकार दिसून येत आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मांडकी गावातील चैतन्य कानिफनाथ निवासी गतिमंद विद्यालयात हा प्रकार घडला आहे. या विद्यालयातील केअरटेकर व शिपाई यांनी गतिमंद विद्यार्थ्यांना लाथाबुक्क्यांसह कुकरच्या झाकणाने मारहाण केली आहे. दीपक इंगळे व प्रदीप देहाडे आरोपींची नावे आहेत. दीपक इंगळे हा या विद्यालयात मागील १० वर्षांपासून शिपाई म्हणून कार्यरत आहे. तो संस्थाचालकाचा नातलग असल्याचेही सांगितले जात आहे. प्रदीप देहाडे हा ही मागील १० वर्षांपासून संस्थेत केअरटेकर म्हणून नोकरीस आहे. हे दोघेही येथील विद्यार्थ्यांना नेहमीच बेदम मारहाण करतात.

दीपक इंगळेने एका विद्यार्थ्याला कुकरच्या झाकणाने मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात आरोपी एका विद्यार्थ्याच्या पाठीत जोरात कुकरचे झाकण मारताना व त्यानंतर सदर विद्यार्थी वेदनांनी विव्हळताना दिसून येत आहे. हा व्हिडिओ ० हायरल झाल्यानंतर संभाजीनगर शहरातील शहरातील चिकलठाणा पोलिस ठाण्यात यासंबंधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रवीकिरण दरवडे यांनी या दोन्ही कर्मचाऱ्यांविरोधात योग्य ती कारवाई सुरू असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी संस्थेतील इतर कर्मचारी व व्यवस्थापनाचीही चौकशी केली जात आहे. दोन्ही आरोपींवर निलंबनाचीही कारवाई करण्यात आली आहे.

राज्याचे मंत्री अतुल सावे यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, ज्या मुलांना आपल्या वेदना सांगता येत नाही, अशा मुलांचा सांभाळ करण्यासाठी सरकारने या संस्था उभ्या केल्या. या संस्थाच छळछावण्या होत असतील, तर ते आपण समाज म्हणून अपयशी ठरल्याचे द्योतक आहे. गतिमंद मुलांना सहानुभूतती नव्हे तर सन्मान व सुरक्षितता हवी आहे. त्यांच्या अश्रूंवर सरकार, समाज व आपली मने जागी झाली पाहिजेत, अन्यथा माणुसकीच्या कुकरचे झोाकण कायमचे बंद होईल. दरम्यान, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ माजली आहे.



## दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संचालकपदी हेमराज बागुल रुजू

**नवी दिल्ली** – माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संचालकपदाचा कार्यभार संचालक हेमराज बागुल यांनी नुकताच स्वीकारला.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी संचालक बागुल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. महाराष्ट्र परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनिषा पिंगळे यावेळी उपस्थित होत्या.

संचालक बागुल महासंचालनालयातील ज्येष्ठ संचालक असून ते मंत्रालयातील मुख्यालयात संचालक (प्रशासन) या पदावर कार्यरत होते. त्यांनी यापूर्वी मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी तसेच महासंचालनालयाच्या नागपूर-अमरावती विभाग आणि छत्रपती संभाजीनगर लातूर विभागाच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळली आहे. शासकीय सेवेत येण्यापूर्वी बागुल यांनी पत्रकारितेत उल्लेखनीय योगदान दिले आहे. तसेच साहित्यविषयक विविध प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनीही बागुल यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# निवासी डॉक्टरांचा संप, ओपीडी सेवांवर परिणाम; फलटण प्रकरणातील न्यायासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. यामुळे रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) सेवांवर परिणाम झाला आहे. फलटण येथील डॉक्टरांच्या प्रकरणात न्याय मिळावा, या मागणीसाठी निवासी डॉक्टरांनी हे आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत संप सुरूच ठेवण्याचा इशारा डॉक्टरांनी दिला आहे.

यादरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचेता जोशी, स्वप्नील केंद्रे यांनी घाटी रुग्णालयाच्या आरोग्य व्यवस्थेची पाहणी केली. निवासी डॉक्टरांच्या अनुपस्थितीत वरिष्ठ डॉक्टरांकडून रुग्णांना सुविधा पुरवल्या जात असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

गेल्या काही दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरमध्ये फलटण येथील डॉक्टरांच्या प्रकरणावरून निषेध आंदोलने सुरू आहेत. रविवारी शहरातील डॉक्टरांनी मशाल मोर्चा काढून या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी केली होती.

या आंदोलनाची सुरुवात निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अपघात विभागासमोर श्रद्धांजली वाहून केली. यावेळी आम्हाला न्याय द्या अशा घोषणा देण्यात आल्या. अपघात विभागासमोर एकत्र येत डॉक्टरांनी आपला निषेध व्यक्त केला.

मार्डचे जनरल सेक्रेटरी डॉ. स्वप्नील केंद्रे यांनी सांगितले की, त्यांना फलटण प्रकरणात न्याय हवा आहे आणि शासनाने या प्रकरणात त्वरित कारवाई करावी, अशी त्यांची मागणी आहे. सध्या सर्व ओपीडी सेवा बंद ठेवण्यात आल्या आहेत. बुधवारपर्यंत कारवाई न झाल्यास सर्व सेवा बंद करण्याचा इशारा डॉ. केंद्रे यांनी दिला आहे.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी आरोग्य व्यवस्थेची पाहणी करताना रुग्णांना सुविधा मिळतात की नाही, याची खात्री केली. त्यांनी प्रत्येक विभागात जाऊन वरिष्ठ डॉक्टरांची उपस्थिती तपासली. निवासी डॉक्टरांच्या अनुपस्थितीत वरिष्ठ डॉक्टरांना रुग्णांना सर्व सुविधा देण्याच्या सूचना डॉ. सुक्रे यांनी दिल्या.




या पाहणीदरम्यान डॉ. सुक्रे यांनी रुग्णांशी संवाद साधला. नेत्र विभागात आलेल्या ७२ वर्षीय महिलेशी त्यांनी चर्चा केली. या महिलेने नुकतीच डोळ्याची शस्त्रक्रिया झाली असून, खूप चांगली सुविधा मिळाल्याचे सांगितले. तसेच, सर्वांनी घाटीतच उपचार घ्यावेत, असे त्या सांगत असल्याचेही त्यांनी नमूद केले. डॉ. सुक्रे यांनी महिलेला आरोग्याची काळजी घेण्यास सांगितले आणि आवश्यक सर्व सुविधा मिळतील, असे आश्वासन दिले.

# एकल महिलांना विविध योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी विशेष अभियान राबवा-उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळवून देण्याची गरज आहे. त्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटनिहाय विशेष अभियान राबवावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुणे जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या मोहिमेच्या धर्तीवर राज्यस्तरावर अभियान राबविण्याबाबत बैठक झाली.



यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव तथा पुणे जिल्ह्याच्या पालक सचिव व्ही.राधा, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वित्त विभागाच्या सचिव शैला ए., ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, एकल महिलांना समाजात सन्मानाची वागणूक देणे, मालमत्तेचे हक्क देणे, आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, त्यांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करावे. केरळ आणि तामिळनाडू या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात एकल महिलांना पुनर्विवाहासाठी आर्थिक मदत करावी. पात्र एकल महिला लाभार्थींना सुद्धा घरकुल योजनेचा लाभ द्यावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून राज्यस्तरीय संगणकीय डेटाबेस प्रणाली तयार करणे, अंगणवाडी सेविका निवड प्रक्रियेप्रमाणे शासन निर्णयात बदल करून एएनएम, स्टाफ नर्स निवड आणि एनएचएम भरती प्रक्रियेत एकल महिलांना प्राधान्य देणे, त्यांना शासकीय कागदपत्रे उपलब्ध करून देणे, व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, एकल महिलांसाठी गाव पातळीवर जागरूकता शिबिरे आणि मार्गदर्शन सत्र आयोजित करणे,अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.




# महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियाना'ला गती-मंत्री आदिती तटकरे

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील प्रत्येक महिलेच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'आदिशक्ती अभियाना'ला राज्यभर गती मिळत आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील ३५१ तालुका आणि २६ हजार ५९ ग्रामस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, या समित्यांचे प्रशिक्षण आणि अभियानाची कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

'आदिशक्ती अभियान व पुरस्कार योजने' च्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठक झाली, यावेळी मंत्री तटकरे यांनी विभागनिहाय आढावा घेतला. यावेळी विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सहसचिव वि.रा. ठाकूर, सहआयुक्त राहूल मोरे, अवर सचिव सुनील सरदार उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागाचे आयुक्त, एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे, तसेच छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोकण, नागपूर आणि अमरावती विभागांचे विभागीय आयुक्त सहभागी झाले होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून महिला बचतगटांचे सक्षमीकरण, महिला सुरक्षा व न्यायप्रवेश, आरोग्य व पोषण जनजागृती, शैक्षणिक व व्यावसायिक उन्नती, नेतृत्व विकास आणि सामाजिक सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबतची जनजागृती ग्रामस्तरावरील प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचविणे हे ध्येय ठेवले आहे.

जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरीय समित्यांचे प्रशिक्षण तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी संबंधित विभागीय आयुक्तांना दिले.

'ग्रामसमृद्धी योजने'च्या धर्तीवर ग्रामसभांमध्ये या अभियानाच्या प्रसारासाठी कार्यवाही करावी, तसेच योजनेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# गौरविलेल्या सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्यांची उभारणी-मंत्री आदिती तटकरे

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील अंगणवाड्यांना आधुनिक, सशक्त आणि पारदर्शक बनवून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यभरात व्यापक कार्यवाही सुरू आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरविण्यात आलेल्या १३ सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्या उभारण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, १३ गावांतील अंगणवाड्यांना स्मार्ट स्वरूप देण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा, डिजीटल शिक्षण साधने, तसेच बालक आणि मातांसाठी आरोग्य व पोषण जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. एकात्मिक बालविकास सेवा (आयसीडीएस) योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये बालकांना आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत मूलभूत सेवा पुरविल्या जातात. या अंगणवाड्यांना स्मार्ट बनविण्याच्या उपक्रमामुळे त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, शिक्षण आणि पोषण सेवा अधिक प्रभावी पद्धतीने दिल्या जात आहेत.

मंत्री तटकरे यांनी म्हणाल्या की, स्मार्ट अंगणवाडी हे केवळ इमारतीचे नव्हे, तर बालक आणि मातांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवेदनशील दृष्टिकोन यांचा संगम घडवून अंगणवाड्यांना आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट स्वरूप



देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

## संपादकीय

# शहरांची नावं बदलताच कशाला?

**मोदी सरकारला शहरांची नावं बदलण्याचंच वेड लागलं आहे. शहरांची नावं बदलल्यामुळे सरकारची, सत्ताधारी पक्षाची लोकप्रियता वाढणार आहे का? २०१४ साली मोदी सरकार सत्तेवर आले आणि तेंव्हापासून व त्याआधीही १९९५ साली शिवसेना भाजप सत्तेवर आल्यापासून शहरांची नावं बदलून टाकण्यासाठी घोषणा केल्या जाऊ लागल्या! विकास घडवून आणायचा नाही! शेतकरी हिताचा विचार कधी करायचा नाही आणि केवळ शहरांची, महत्त्वाच्या स्थळांची संस्थाची नावं बदलण्याचेच वेड सत्ताधाऱ्यांना लागलेले आहे. नावं बदलण्यास विरोध नाही पण जनतेचे प्रश्न सोडवायचे नाहीत आणि केवळ नावं बदलण्यावरच भर द्यायचा, हे काही शहाणपणाचं लक्षण नाही. जे सरकार कर्तृत्वशून्य आहे त्या सरकारने आपले वेगळेपण एकाच मुद्याशी निश्चित केले केवळ नावं बदलणे हेच एकमेव वेगळेपण मोदी यांच्या सरकारच्या कार्यकाळात दिसून येऊ लागले. छत्रपती शिवाजी महाराजांनी, छत्रपती संभाजीराजे यांनी शेतकऱ्यांचे, गरीब जनतेचे कल्याण करण्याचे धोरण राबवले. मात्र मोदी सरकारच्या कार्यकाळात नावं बदलण्यावर भर व शेतकरी हिताकडे दुर्लक्ष असे चित्र दिसून येऊ लागले. छत्रपती संभाजी राजे यांचे नाव औरंगाबाद शहराला दिले हे चांगले पण मोदी सरकारचे कर्तृत्व यात तफावत आहे. साडेतीनशे वर्ष झाली तरी छत्रपतींचे नाव सामान्य जनता आजही घेत आहे. आपण छत्रपतींसारखेच कार्य करू, असा संकल्प करू न शकणाऱ्या मोदी सरकारला म्हणजेच भाजप सरकारला शहरांची नावं बदलण्याचा नैतिक अधिकार नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कल्याणकारी धोरण न राबवणाऱ्या मोदी सरकारच्या काळात औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर करण्यात आले. हे नाव जनतेला पसंत असले तरी ते नाव बदलण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारकडे कल्याणकारी धोरण नाही! शहरांची नावं बदलून विकास होत नसतो. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सरकार काही करू शकत नाही, पण उतावीळपणा मोदी सरकारच्या मोठा काळात झाला. अहमदनगरचे नाव अहिल्यानगर करण्यात आले. पण आजही महिलांवर अत्याचार होतच आहेत. एकीकडे महिलांवर अत्याचार खपवून घेणारे मोदी, फडणवीसांचे सरकार अहमदनगरला अहिल्याबाईंचे नाव देते, ही मोठी विसंगती आहे. अहिल्याबाई यांनी जसे कार्य केले तसे कार्य न करू शकणारे सरकार फक्त एकच उतावीळपणा दाखवते तो म्हणजे केवळ शहरांची नावं बदलणे! असे केल्याने इतिहास घडत नसतो.**

# भारतीय महिला क्रिकेटचा सुवर्ण विश्वविजय : राष्ट्रगौरवाचा ऐतिहासिक क्षण



भारतीय क्रीडा इतिहासात २०२५ हे वर्ष सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल, कारण भारतीय महिला क्रिकेट संघाने प्रथमच विश्वचषक आपल्या नावावर करत संपूर्ण राष्ट्राचा अभिमान उंचावला आहे. या विजयानं केवळ एका स्पर्धेचं पारितोषिक जिंकण्यात अर्थ नाही, तर भारतीय स्त्रीशक्तीने जागतिक पटलावर आपली ओळख, सामर्थ्य आणि क्रीडाजिद्द किती उंचावली आहे, याचे प्रतीक आहे. मुंबईमध्ये पार पडलेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने प्रतिस्पर्धी दक्षिण आफ्रिका महिला संघाला पराभूत करून जेतेपद पटकावले आणि जगभरात भारतीय महिलांच्या क्रीडाप्रतिभेचा गौरवशाली नाद घुमवला. या विजयाने देशात साजरा होणारा उत्सव केवळ क्रीडाजगतातील आनंद नसून, सामाजिक परिवर्तनाचे, लिंगभाव समतेचे आणि स्त्री सक्षमीकरणाचे सजीव दर्शन आहे.

भारतीय महिला क्रिकेटचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. काही दशकांपूर्वीपर्यंत महिलांसाठी क्रिकेट हा केवळ 'पुरुषांचा खेळ' मानला जायचा. समाजातील पारंपरिक विचारसरणी, खेळात गुंतवणूक करण्याची असमानता, प्रशिक्षण व साधनांची कमतरता आणि कौटुंबिक बंधने या साऱ्या अडथळ्यांमधून भारतीय महिला खेळाडूंनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाने आपला मार्ग स्वतः तयार केला. मिताली राज, झुलन गोस्वामी, हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, शफाली वर्मा, दीप्ती शर्मा यांसारख्या खेळाडूंनी भारतीय महिला क्रिकेटला ज्या उंचीवर नेले, ती आज जगाच्या क्रीडाक्षेत्रात गौरवाने स्मरणात ठेवली जाईल. त्यांचं योगदान केवळ खेळापुरतं नाही, तर सामाजिक मानसिकतेत बदल घडवण्याचं काम त्यांनी केलं आहे.

२०२५ च्या या विजयानं अनेक वर्षांचा संघर्ष, धैर्य आणि सामूहिक प्रयत्नांचा परिपाक साधला आहे. या संघाने केवळ क्रिकेट खेळलं नाही, तर त्या खेळात राष्ट्रभावनेची जाणीव आणि स्त्री सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिला. भारतीय महिला क्रिकेट संघाने या विश्वचषकात दाखवलेला एकजूटपणा, तांत्रिक परिपक्वता आणि मानसिक ताकद हा भारतीय क्रीडा व्यवस्थेच्या नव्या युगाचा संदेश आहे. अंतिम सामन्यातील हरमनप्रीत कौरची कप्तानी, शफाली वर्मा, स्मृती मंधानाची, संयमी खेळी आणि दीप्ती शर्माचा ऑलराउंड परफॉर्मन्स यांनी भारतीय संघाला अविजेय बनवले. या विजयामागे प्रशिक्षक मंडळ, सहाय्यक कर्मचारी, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रत्येक खेळाडूची देशासाठी खेळण्याची प्रेरणा आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भारतीय महिला क्रिकेट संघाचा हा विजय स्त्री सक्षमीकरणाच्या प्रगत टप्प्याचे प्रतीक आहे. भारतात दशकानुदशके लिंगभाव असमानता ही सामाजिक समस्या राहिली आहे. शिक्षण, रोजगार, राजकारण आणि खेळ या सर्व क्षेत्रांत महिलांना समान संधी मिळवण्यासाठी दीर्घ संघर्ष करावा लागला. पण या विजयानं स्त्रिया केवळ 'दुसऱ्या क्रमांकावर' राहणारी व्यक्ती नाहीत, तर त्या नेतृत्व करू शकतात, संघाला विजयाकडे नेऊ शकतात, राष्ट्राचा अभिमान बनू शकतात, हे जगाला दाखवून दिलं आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाचा विजय म्हणजे लिंगभाव समतेचा विजय आहे.

क्रिकेट हा भारतात धर्मासारखा मानला जाणारा खेळ आहे. दीर्घकाळ तो पुरुषप्रधानतेच्या पिंजऱ्यात अडकलेला होता. पण २०२५ च्या या विश्वचषकानंतर त्या चौकटी तुटल्या आहेत. भारतीय महिलांनी दाखवून दिलं की क्रिकेटवरील अधिकार कोणाचाही एकाधिकार नाही; प्रतिभा, मेहनत आणि जिद्द असली की मैदानावर कोणीही चमत्कार घडवू शकतो. या विजयानं ग्रामीण भागातील, लहान शहरांतील आणि आर्थिकदृष्ट्या मर्यादित कुटुंबातील मुलींना नव्या स्वप्नांची प्रेरणा दिली आहे. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार, अशा क्रीडाविजयांमुळे सामाजिक समता आणि आत्मसन्मानाची भावना व्यापक स्तरावर वाढते. ही केवळ खेळाची जिंक नाही, तर सामाजिक मानसिकतेची झेप आहे.

भारतीय महिला क्रिकेटचा विकास हा केवळ खेळाडूंच्या प्रयत्नांमुळे नाही, तर मागील काही वर्षांत झालेल्या संरचनात्मक बदलांमुळे शक्य झाला. भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाने महिला क्रिकेटसाठी स्वतंत्र गुंतवणूक, करार आणि सुविधा निर्माण केल्या. महिला () च्या स्थापनेनं महिला खेळाडूंना व्यावसायिक मंच उपलब्ध झाला. माध्यमांनीही महिला क्रिकेटकडे गांभीर्याने पाहायला सुरुवात केली. या सगळ्यामुळे महिला खेळाडूंना आत्मविश्वास मिळाला आणि समाजात त्यांच्या कार्याची दखल घेण्याची प्रवृत्ती वाढली.

या विजयानं देशात सर्व स्तरांवर स्त्री सक्षमीकरणाबद्दल सकारात्मक संदेश दिला आहे. ग्रामीण मुलींना वाटू लागलं आहे की क्रीडांगणही त्यांच्या स्वप्नांची पूर्ती करू शकतं. महिला खेळाडू आता केवळ 'प्रेरणास्थान' नाहीत, तर त्या समाजातील बदल घडवणाऱ्या 'प्रेरक शक्ती' बनल्या आहेत. या विजयामुळे मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलतो आहे, कारण समाजात आदर्श निर्माण झाला आहे की मुलगीने जर ठरवले, तर तीही आकाशाला गवसणी घालू शकते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशा विजयांमुळे समाजात लिंगभेदावर आधारित रूढी मोडतात. स्त्रियांच्या क्षमतांबद्दलच्या पूर्वग्रहांचा भंग होतो आणि पुरुषसत्ताक मानसिकतेला जबाबदार प्रश्न विचारले जातात. महिला क्रिकेट संघाचा हा विजय म्हणजे भारतीय समाजाच्या बदलत्या मानसिकतेचं दर्शन आहे. जिथे स्त्रीला आता 'कमकुवत' म्हणून नव्हे, तर 'समान योगदानकर्ती' म्हणून ओळख दिली जाते.

या विजयानं भारतीय तरुण पिढीला नवी प्रेरणा मिळाली आहे. शाळा-महाविद्यालयांतील क्रीडा स्पर्धांमध्ये मुलींचा सहभाग वाढेल, महिला प्रशिक्षक आणि क्रीडा प्रशासक निर्माण होतील, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे क्रीडा क्षेत्रातील लैंगिक समानतेचं स्वप्न आता प्रत्यक्षात येईल. क्रीडांगणावर महिलांची उपस्थिती म्हणजे समाजातील समतोल शक्तींचं प्रतिनिधित्व आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या या कामगिरीनं राष्ट्राला आत्मगौरवाचा नवा अनुभव दिला आहे. पंतप्रधानांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांनी या विजयाचं कौतुक केलं. भारतीय तिरंग्याखाली उभ्या राहिलेल्या त्या अकरा-पंधरा योद्ध्या आज प्रत्येक भारतीय मुलीच्या प्रेरणेचं प्रतीक बनल्या आहेत. हे केवळ क्रीडाजगतातील जेतेपद नाही, तर सामाजिक समतेचं, आत्मसन्मानाचं आणि प्रगत भारताचं द्योतक आहे.

भारतीय समाजशास्त्रात 'सामूहिक प्रेरणा' ही संकल्पना महत्त्वाची आहे. जेव्हा एखाद्या समाजगटाचं यश संपूर्ण समाजाला उभारी देतं. महिला क्रिकेट संघाचा विजय तसाच आहे. तो केवळ खेळाचा नव्हे, तर भारतीय स्त्रीच्या आत्मबळाचा उत्सव आहे.

या विजयाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयाने या संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. कारण त्यांनी दाखवून दिलं की संधी मिळाल्यास भारतीय महिला कोणत्याही क्षेत्रात जगावर राज्य करू शकतात. त्यांनी राष्ट्राला नवा आत्मविश्वास, नवी ऊर्जा आणि नवा अभिमान दिला आहे. त्यांचं हे यश पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल.

अखेर सांगावसं वाटतं की भारतीय महिला क्रिकेट संघाचा २०२५ विश्वचषक विजय हा केवळ एका खेळाचा गौरव नाही, तर भारतीय समाजाच्या प्रगत वाटचालीचा मैलाचा दगड आहे. या विजयानं सिद्ध केलं आहे की समतेच्या मैदानावर स्त्रिया केवळ स्पर्धक नाहीत, तर नेतृत्वकर्त्या आहेत. या विजयाने भारतातील प्रत्येक घरात, प्रत्येक मुलीच्या डोळ्यांत स्वप्न पेटलं आहे ते स्वाभिमानाचं, आत्मनिर्भरतेचं आणि राष्ट्रगौरवाचं. भारतीय महिला क्रिकेट संघाचे अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा..!

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**समाजशास्त्राचे अभ्यासक**

# पावसातली भात कापणी...!



''अवंधू भात बरा व्हता. मॉप तांदूळ झालो आसतो. पण या पावसावर वशाडी इली ना. हातातोंडाक गावणारो घास या पावसाच्या उच्छादान नाय करून टाकल्यान'' हा संवाद अवघ्या कोकणातील पालघरपासून बांद्यापर्यंत सध्या कानावर येतोय. त्याचे कारणही तसेच घडले आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिना म्हटला की उष्णतेच्या झळा सोसाव्या लागायच्या. ऑक्टोबर हीट हा शब्द कानी पडायचा; परंतु यावर्षी ऑक्टोबर महिन्यात जून-जुलै महिन्यात कोसळावा तसा पाऊस कोसळत आहे.

महाराष्ट्रामध्ये ऋतुचक्र कशा पद्धतीने बदलत आहे, हे गेल्या काही वर्षांमध्ये आपण पाहत आहोत. पूर्वी काही दुष्काळी जिल्हे म्हणून ज्यांची ओळख होती, त्या भागातून अलीकडे विपुल पाणीसाठा उपलब्ध आहे. काही भागातील सिंचन प्रकल्प काही प्रमाणात पूर्ण झाल्याने, ज्या भागावर दुष्काळी सावट होते, ते पाण्याने दूर होताना आपणाला पाहायला मिळत आहे. पूर्वी राज्यातील दुष्काळी भागात आकाशात दाटलेले ढग जरी गावकऱ्यांनी पाहिले, तरीही शेतकरी आनंदी व्हायचा. दुर्दैवाने तेव्हा या दुष्काळी भागात वर्ष-दोन वर्षे पाऊसच पडायचा नाही. फक्त काळवंडलेले धावणारे ढग तितके दिसायचे. जेव्हा महाराष्ट्र पावसाची आतुरतेने वाट पाहत असायचा, तेव्हा कोकण मात्र पावसाच्या पाण्याने दुथडी भरून वाहत असायचे.

एकदा जून महिन्यात कोकणात मृग नक्षत्राला पावसाने हजेरी लावली की, तो सप्टेंबर अखेर अगदी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस पडत होता आणि ऑक्टोबर महिन्यापासून पावसाचा गारवा जाऊन उन्हाच्या झळा सुरू व्हायच्या. भरपूर पडलेल्या पावसाने कोकणातील शेती बहरलेली असायची. श्रावण महिन्यातील सण, गणेशोत्सवातील गणपती विसर्जनानंतर येणारी दिवाळीची पहाटच शेतकऱ्यांसाठी आनंद आणि सुखाची नांदी घेऊन यायची. शेतातील भातपीक तयार झालेले असायचे. एकीकडे शहरी भागात राहणारे दिवाळीच्या फराळात व्यस्त असताना, कोकणातील शेतकरी मात्र त्याच्या शेतातील भातशेती कापण्यात गुंतलेला असायचा. त्याकाळी पाऊस येतच नव्हता असं नाही; परंतु परतीच्या पावसाची एखादी-दुसरी सर केवळ हजेरीपुरती असायची. भात कापणीचे काम करणाऱ्या शेतकऱ्यांची धावपळ व्हायची अगदीच नाही असं नाही; परंतु त्याचे फार काही शेतकऱ्याला वाटायचे नाही, कारण पाऊस आला म्हणेपर्यंत पावसाने उघडीप घेतलेली असायची.

परंतु दुर्दैवाने यावर्षी मात्र, ''अवंधू भात बरा व्हता. मॉप तांदूळ झालो आसतो. पण या पावसावर वशाडी इली ना. हातातोंडाक गावणारो घास या पावसाच्या उच्छादान नाय करून टाकल्यान'' हा संवाद अवघ्या कोकणातील पालघरपासून बांद्यापर्यंत सध्या कानावर येतोय. त्याचे कारणही तसेच घडले आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिना म्हटला की उष्णतेच्या झळा सोसाव्या लागायच्या. ऑक्टोबर हीट हा शब्द कानी पडायचा; परंतु यावर्षी ऑक्टोबर महिन्यात जून-जुलै महिन्यात कोसळावा तसा पाऊस कोसळत आहे.

एकतर कोकणात अनेक कारणांनी भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी होत आहे. भातशेतीचे असणारे क्षेत्र, कोकणातील भाऊबंदकीत शेतीची झालेली वाटणी आणि वाट्याला कमी क्षेत्र आल्याने कशाला भातशेती करायची म्हणून काहींनी भातशेती सोडली, तर काहींच्या मते शेतात राबणारे कुटुंबातील हातच कमी झालेत, मग शेतात कोण राबणार? भातशेती परवडत नाही, भातशेतीत काम करायला मजूर मिळत नाहीत, असा काहींचा सूर आहे; परंतु काहींच्या मते भातपिकातून चांगली कमाई देखील होऊ शकते, मात्र यासाठी फार कष्ट आहेत.

यावर्षी नोव्हेंबर महिना उजाडला, तरीही पाऊस काही थांबत नाही आहे. कोकणातील शेतकरी भातशेती कापताना डोळ्यांत जरूर पाणी आणतो; परंतु त्याचे फोटो किंवा व्हिडीओ तो करत नाही. जो निसर्गाने निर्माण केलेला प्रसंग आहे, त्याला सामोरे जाण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न करतो. यावर्षीच्या पावसाने शेतीचा हा हंगामच बिघडवला आहे. कोकणातील अनेक भागात आजही पाऊस कोसळत असल्याने भातकापणी सध्या भर पावसातच होत आहे. यामुळे भातकापणीनंतर गुरांना लागणारे गवतही पावसामुळे खराब होणार आहे. यामुळे कोकणातील शेतकरी खऱ्या अर्थाने चिंतेत आहे. काही गावांतून शेतात फूटभराचे पाणी आहे. या पावसाच्या पाण्यातही भातकापणी अशाच पाण्यात झाल्याने भातपीक किती हाती येईल, हे सांगता येणे अवघड झाले आहे.

रायगड जिल्ह्यात आजही मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जाते. भातपीक घेणारा हा भाग आहे. पूर्वीपासूनच भातशेतीत रायगड जिल्हा अग्रभागी असतो. आजही रायगडमध्ये भातपीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते; परंतु सर्वत्रच पाऊस दररोज कोसळत असल्याने भातकापणी करणेही अवघड झाले आहे. पूर्वी नोव्हेंबर महिन्यात कधीतरी अवकाळी पाऊस यायचा; परंतु आता तर दररोज न चुकता दिवसभर पाऊस पडतो. यामुळे भातकापणीचे काम होऊ शकलेले नाही. कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कोकणातील कोकण कृषी विद्यापीठाने काही नवीन संकरित भाताची बियाणे तयार केली आहेत. या बियाण्यांचा शेतकरी आता मोठ्या प्रमाणावर फायदाही घेऊ लागले आहेत. पारंपारिक भात बियाणे आता जवळपास बंद झाली आहेत. संकरित नव्या भात बियाण्यांची पेरणी करून त्यातून दामदुप्पट उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. काही गावातील तरुण शेतकरी या संकरित भात बियाण्यांची शेतात पेरणी करून चांगले उत्पादन घेत आहेत. या तरुण शेतकऱ्यांच्या माध्यमातून भातशेतीतील बदलाचे चांगले परिणामही कोकणात दिसू लागले आहेत. कमी कष्टात, कमी खर्चात जास्त उत्पादन या संकरित भात बियाण्यातून मिळते, त्याचाच वापर केला जात आहे.

पावसाने भातशेतीचे कोकणातील सर्वच जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. भातपीक चांगले आले आहे. या हंगामात भरपूर पाऊस येऊनही भाताचे पीक चांगले आले होते; परंतु भातकापणीच्या हंगामातच पाऊस कोसळत असल्याने कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत कोसळणाऱ्या पावसाने भातशेतीचे जसे नुकसान झाले, त्याचबरोबर याचा परिणाम मासेमारीवरही झाला आहे. कोकणात मासेमारीचा कोट्यवधी रुपयांची उलाढाल असणारा उद्योग आहे. कोकणात कोसळणारा पाऊस आणि कोकणच्या किनाऱ्यावरचे वादळ यामुळे कोकणात मासेमारीचा व्यवसाय ठप्प झाला आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून यलो अलर्ट, रेड अलर्ट अशा हवामान खात्याच्या अंदाजातच गेले काही महिने चालले आहेत. शेती आणि मासेमारी व्यवसायावर परिणाम करणारा हा पाऊस कधी थांबतोय, याच प्रतीक्षेत कोकणातील सर्वसामान्य शेतकरी आहे.

**– संतोष वायंगणकर**

***

# 'राणीची वाव' एक अद्वितीय जलमंदिर

भारतातील प्रत्येक राज्यात काही ना काही ऐतिहासिक स्मारके आहेत ज्यामुळे त्या त्या राज्याचा सांस्कृतिक आणि कलात्मक वारसा जिवंत ठेवतात. गुजरात राज्यातील 'राणी की वाव' म्हणजेच राणीने आपल्या पतीच्या स्मरणार्थ कायमस्वरूपी पाण्याचा केलेला वैशिष्ट्यपूर्ण जलस्रोत! ही 'वाव 'असेच एक अप्रतिम पुरातन जलकुंड आहे. जे दिसायला उलट्या मंदिरासारखे बांधलेले आहे.

पाटण शहरात असलेली ही 'वाव' भारतीय वास्तुकलेचा अद्वितीय नमुना असून, तिच्या कलात्मक रचनेमुळे युनेस्कोने २०१४ साली तिला ''जागतिक वारसा स्थळ'' (वर्ल्ड हेरिटेज साइट) म्हणून मान्यता दिली. चला तर फेरफटका मारून येऊया या ऐतिहासिक वारसा असलेल्या 'राणीची वाव' वास्तुकलेला.

'राणीची वाव' गुजरात राज्यातील पाटण या प्राचीन नगरात, सरस्वती नदीच्या काठावर वसलेली आहे. ही वास्तू म्हणजे, पुरातन वैशिष्ट्यपूर्ण वास्तूकलेचा अप्रतिम नमुना आहे. एकेकाळी पाटण ही सोलंकी राजवंशाची राजधानी होती. त्या काळामध्ये पाटण शहरांमध्ये अनेक कलात्मक व सांस्कृतिक समृद्धीचा उत्कर्ष झाला होता.

'वाव' म्हणजे विहीर किंवा पायऱ्यांनी बनवलेला जलाशय. गुजरात, राजस्थान या प्रदेशात पाण्याची खूप टंचाई होती. ज्या काळात पाण्याची टंचाई निर्माण होत असे त्या काळात या जलाशयाचा वापर जनतेसाठी केला जात असे. पाणी साठविण्याची व उपयोग करण्याची उत्कृष्ट शास्त्रीय पद्धत म्हणजे ही विहीर. ही विहीर केवळ पाण्याचा साठा करण्यासाठी नव्हे तर धार्मिक आणि सामाजिक कारणांसाठीही वापरली जात असे. प्राचीन काळात 'वाव म्हणजेच 'स्टेपवेल' हा जलस्रोत जतन करण्याचा एक उत्कृष्ट मार्ग होता. पण 'राणी की वाव'ने या संकल्पनेला एक कलात्मक आणि धार्मिक रूप दिले आणि जलदेवतेला ही वास्तू अर्पण केली.

पाटण शहर त्या काळी 'अनहिलवाड पाटण' म्हणून ओळखले जाई. हे सोलंकी साम्राज्याचे सांस्कृतिक केंद्र होते. येथील मातृदेवता, कला आणि धर्म यांचा संगम 'राणी की वाव'मध्ये स्पष्ट दिसतो. 'राणी की वाव' ही वाव इ.स. ११ व्या शतकात सोलंकी वंशातील राजा भीमदेव पहिला यांच्या स्मरणार्थ त्यांच्या राणी उदयामती हिने बांधली. पाटण हे त्याकाळी सोलंकी साम्राज्याची राजधानी होते. या वास्तूचे बांधकाम अंदाजे इ.स. १०५० ते १०६० दरम्यान पूर्ण झाले.

'राणी की वाव' ही साधी जलवाव नसून, ती एक भव्य भूमिगत महालासारखी वाटते. अंदाजे ६५ मीटर लांब, २० मीटर रुंद आणि २७ मीटर खोल अशी ही वाव सात मजली इमारत आहे. प्रत्येक स्तरावर सुंदर कोरीव स्तंभ, मंडप आणि देवतांच्या मूर्ती कोरल्या आहेत.

वावेत जाण्यासाठी जिने आहेत आणि प्रत्येक पायरीबरोबर वास्तू अधिक खोल व अधिक भव्य होत जाते. वावेत एकूण ५०० हून अधिक कोरीव मूर्ती आहेत, ज्यामध्ये विष्णूच्या विविध अवतारांचे (दशावतार), गणेश, पार्वती, ब्रह्मा, लक्ष्मी, सूर्य, आणि इतर अनेक देव-देवतांचे अप्रतिम शिल्प कोरलेले आहेत ते पाहताना थक्क व्हायला होतं. वावेत जलसंचयासाठी तळाशी एक विशाल जलकुंड आहे. पावसाळ्यात नद्यांना पूर येतात त्या वेळी पुराच्या पाण्याने ही वाव भरली जाई आणि तेथील लोकांना वर्षभर पाणी मिळत असे.

पहिल्या स्तरावर प्रवेशद्वाराजवळ रुंद पायऱ्या आणि आकर्षक कमानी आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या स्तरावर विष्णू, गणेश, पार्वती आणि सूर्यदेव यांच्या मूर्ती आहेत. चौथ्या ते सहाव्या स्तरावर विविध अप्सरा, दैवी स्त्रिया, नृत्यांगना, गंधर्व, योगिनी, नागकन्या अशा पौराणिक कथांची दृष्यरूपं सौंदर्याची प्रतीकं म्हणून साकार केली आहेत आणि सातव्या म्हणजे शेवटच्या कालच्या स्तरावर जलकुंड आणि मध्यभागी भगवान विष्णूचे 'शेषशायी' रूपातील भव्य शिल्प कोरलेले आहेत.

त्या काळात पाणी ही जीवनाची सर्वात मोठी गरज असल्याने वाव बांधण्यामागे केवळ सौंदर्य नव्हते, तर वैज्ञानिक हेतूही होता. पावसाळ्यात नदीचे पाणी या वावेत साठवले जाई, तापमान नियंत्रित ठेवण्याची शास्त्रीय रचना यात होती आणि उन्हाळ्यातही त्यात थंड पाणी राहात असे. कारण या दगडांनी बांधलेल्या खालच्या जळतळात पाणी नैसर्गिकरीत्या थंडगार राहत असे.

या वावेत सुमारे ५०० प्रमुख मूर्ती आणि लहान-मोठ्या मिळून १००० पेक्षा जास्त अलंकारिक शिल्पं कोरलेली आहेत. त्यातील काही उल्लेखनीय शिल्पे आहेत. शिल्पांतील सूक्ष्म भावभावना, अंगविक्षेप आणि अलंकारांची नजाकत पाहून थक्क व्हायला होते.

भिंतींवरील कोरीव काम इतके सूक्ष्म आहे की प्रत्येक देवतेच्या भावभावना, वस्त्र, अलंकार आणि मुद्रांमध्ये प्राण ओतलेला दिसतो. विशेष म्हणजे येथे विष्णू भगवानाचे शेषशायी स्वरूप अत्यंत सुंदररीत्या कोरले आहे. तसेच कामशास्त्र, नृत्य, संगीत, लोकजीवन यांचे दृश्यरूप दाखवणारी अनेक शिल्पे देखील येथे आढळतात, त्यामुळे शिल्पकलेचा सुरेख संगम जाणवतो. ही वाव एकप्रकारे त्या काळच्या शिल्पकारांच्या कल्पकतेचा व सौंदर्यदृष्टीचा सर्वोच्च नमुना आहे.

आज भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग (एएसआय) या वास्तूचे संवर्धन करत आहे. वाव परिसर स्वच्छ, सुशोभित आणि पर्यटकांसाठी खुला ठेवण्यात आला आहे. येथे वार्षिक 'राणी की वाव फ ेस्टिव्हल' आयोजित केला जातो ज्यामध्ये लोककला, हस्तकला आणि गुजराती संस्कृतीचा उत्सव साजरा होतो.

**– लता गुठे**

## थोडक्यात

### प्रेम, ऐक्य आणि सौहार्द वृद्धिंगत करणे हाच दिवाळीचा संदेश

टाकळी जिवरग दि.३ (प्रतिनिधी)– टाकळी जिवरग सिल्लोड तालुक्यातील कायगाव येथे दीपावली आणि पाडवा या निमित्ताने सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती विश्वास दाभाडे यांच्यातर्फे दीपावली स्नेहमीलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या स्नेहमीलन कार्यक्रमास माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी विशेष उपस्थिती दर्शवून उपस्थितांना दीपावली व पाडवा निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आमदार अब्दुल सत्तार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘एकत्र येऊन आनंद साजरा करणे, भाऊबीजेच्या निमित्ताने प्रेम, ऐक्य आणि सौहार्द वृद्धिंगत करणे, हाच खरा दिवाळीचा संदेश आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांनी एकमेकांशी संवाद साधत प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकले पाहिजे. तसेच आगामी काळात नगर नगरपरीषद ,जिल्हापरिषद , पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी एकोप्याने काम करून शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून जास्तीत जास्त जागा निवडुण कशा येतील त्या साठी काम करायला हवे. कार्यक्रमात जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन आर्जुन गाडे, केशवराव तायडे, सुखदेव जाधव, नंदकिशोर सहारे, हानिफ मुलतानी, राजेद्र खरात तसेच सर्व प्रमुख पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते, नागरिक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कायगावात दीपावली स्नेहमिलन सोहळ्याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांनी मार्गदर्शन केले.

### पुण्यात मानसिक आरोग्यविषयक माइंडफॉरवर्ड इंडिया कॉन्क्लेव्हचे आयोजन

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– भारतातील नामांकित मानसिक आरोग्य तज्ज्ञ पुण्यात झालेल्या माइंडफॉरवर्ड इंडिया कॉन्क्लेव्ह’ मध्ये एकत्र आले. शहरात प्रथमच अशा प्रकारचा हा उपक्रम झाला असून या प्रसंगी ‘हॅपी स्टडीस्पेसेस’ या विशेष विद्यार्थी–केंद्रित मानसिक आरोग्य उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या माध्यमातून पुण्यातील महाविद्यालयांमधील ५०,००० हून अधिक विद्यार्थ्यांना मोफत व्यावसायिक समुपदेशन आणि मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. हा उपक्रम अपोलो हॉस्पिटल्स समूहातील ‘अपोलो टेलिमेडिसिन नेटवर्किंग फाउंडेशन ’ तर्फे राबविला जात असून ‘बीपी) या आंतरराष्ट्रीय ऊर्जा कंपनीचे सहकार्य त्यास लाभले आहे. हॅपी स्टडीस्पेसेस’ उपक्रमाचा उद्देश प्रत्येक कॅम्पसला काळजी, संवाद आणि आत्मविश्वासाचे केंद्र बनविणे हा आहे. यात एआय–आधारित मानसिक आरोग्य मूल्यांकन प्रणाली, टप्प्याटप्प्याने केलेले समुपदेशन मॉडेल, तसेच रेझिलियन्स टिप्स, कौन्सेलिंग आणि स्पेशालिस्ट रेफरल्ससह सातत्यपूर्ण फॉलोअपचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना कौन्सेलिंग हेल्पलाईन, व्हॉट्सअॅप सपोर्ट चॅनल, तसेच ‘हॅपीयू क्लब’ या सहविद्यार्थी–नेतृत्वाखालील मानसिक तंदुरुस्ती उपक्रमांचा लाभ मिळणार आहे.

### स्पेशल हँडलूम एक्स्पो २०२५ परंपरेचे धागे ठाण्यात सुरू

ठाणे दि.३ (प्रतिनिधी)– ठाणे शहर सध्या भारताच्या रंगीबेरंगी विणकाम, परंपरा आणि कलांनी सजलेले आहे. स्पेशल हँडलूम एक्स्पो २०२५ (द्वितीय आवृत्ती) चे उद्घाटन आज सीकेपी हॉल, खरकर लेन, ठाणे (महाराष्ट्र) येथे झाले.

ही प्रदर्शनी नॅशनल डिझाईन सेंटर तर्फे आयोजित करण्यात आली असून, विकास आयुक्त (हँडलूम), वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने आयोजित केली आहे. ही एक्स्पो ३ ते ९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान दररोज सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुली राहील.

या एक्स्पोमध्ये देशभरातील बुनकर (विणकर) आपली अनोखी कलाकृती आणि पारंपरिक डिझाईन्स प्रदर्शित करत आहेत. तेलंगणा, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, ओडिशा, महाराष्ट्र, गुजरात अशा विविध राज्यांतील प्रसिद्ध हँडलूम उत्पादने येथे पाहायला मिळत आहेत. रेशमी साड्या, दुपट्टे, स्टोल, ड्रेस मटेरियल, शाल तसेच गृहसजावटीच्या वस्तू त्यांच्या रंग, बुनावट आणि दर्जामुळे लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

### अमेरिकन टुरिस्टरने ‘‘मेड इन नाशिक. फॉर द वर्ल्ड‘‘ नवीन मोहीम सुरू केली

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– अमेरिकन टुरिस्टरने ‘‘मेड इन नाशिक. फॉर द वर्ल्ड‘‘ ही त्यांची नवीन मोहीम सुरू केली आहे, हा चित्रपट ब्रँडच्या जागतिक प्रवासामागील शहराचे वर्णन करतो. ब्रॅण्डची जगातील सर्वात मोठी फॅक्टरी असलेल्या नाशिकमध्ये, कारागिरी आणि कौशल्य जिवंत आहे. ही मोहीम म्हणजे अमेरिकन टुरिस्टरच्या जागतिक प्रवासाला आयकॉन म्हणून बळ देणाऱ्या अभिमानाला, व्याप्तीला आणि लोकांना दिलेली आदरांजली आहे.

नाशिक प्लांटमधील कामगारांच्या दृष्टिकोनातून चित्रित केलेला हा टीव्हीसी – जिथे हस्तकलेच्या निर्मितीतील अचूकता, नाशिकच्या चैतन्यशील कला आणि संस्कृतीमध्ये अखंडपणे मिसळते – नदीकाठापासून बाजारांपर्यंत, ढोलाच्या तालापासून पैठणीच्या सौंदर्यापर्यंत – ही मोहीम प्रत्येक तपशीलात नाशिकचे मनोगत टिपते. या कथेत शहरातील कारागिरीची खोलवर रुजलेली परंपरा दररोज फॅक्टरीतून कशी पसरते हे दाखवले आहे, जी ब्रँडला पुढे नेणाऱ्या लोकांच्या चिकाटीने साकारली आहे.

प्रत्येक कामगार त्यांच्या कलाकुसरीत निपुणता, कौशल्य आणि आवड आणतो, जगभरातील लाखो ग्राहकांपर्यंत पोहोचणारी उत्पादने तयार करतो. या ब्रँडशी २५,००० कुटुंबे जोडून, हा चित्रपट जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे सामान तयार करण्यासाठी संपूर्ण समुदाय आपले मन आणि आत्मा कसे पणाला लावतो यावर प्रकाश टाकतो.

### देशव्यापी कला, हस्तकला आणि साहित्य स्पर्धा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– भारतातील खाजगी क्षेत्रातील एक सर्वात मोठी बँक, ऑक्सिस बँकेने स्प्लॅश २०२५ सुरु होत असल्याची घोषणा केली आहे. संपूर्ण देशभरातील स्पर्धकांचा सहभाग असलेल्या, दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या कला, हस्तकला आणि साहित्य स्पर्धेचे हे १३वे वर्ष आहे. दिल से ओपन या ऍक्सिस बँकेच्या ब्रँड सिद्धांताला अनुसरून, यंदाच्या वर्षीची संकल्पना आहे ‘‘ड्रीम्स‘‘ अर्थात स्वप्ने! देशभरातील मुलामुलींना त्यांची कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे हा स्पर्धेचा उद्देश आहे. सहभागी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करून प्रवेशिका सादर करता येतील. त्याचबरोबरीने ऍक्सिस बँकेच्या निवडक शाखा, शाळा, रहिवाशांच्या कल्याणकारी संघटना इत्यादी ठिकाणी देखील स्पर्धांचे आयोजन केले जाईल. भारतभरात ११ लाखांहून जास्त मुले ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने यामध्ये सहभागी व्हावीत असा उद्देश आहे. प्रवेशिका सादर करण्यासाठी दोन उप–संकल्पना ठरवून देण्यात आल्या आहेत – ७ ते १० वर्षे वयोगटासाठी ए डे इन माय ड्रीम लाईफ आणि ११ ते १४ वर्षे वयोगटासाठी द फ्युचर ऍज आय ड्रीम इट हे विषय आहेत. १०० पेक्षा जास्त ज्युरी या सर्व प्रवेशिकांचे मूल्यांकन करतील.

# जिल्हाधिकाऱ्यांना फोन जाताच अक्षदा पडण्यापूर्वी १६ वर्षीय मुलीचा विवाह रोखला

## हमालवाड्यात दामिनी पथकासह जिल्हा महिला बालविकास विभागाची कारवाई

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)– एका अज्ञात व्यक्तीने १६ वर्षीय मुलीचा २५ वर्षीय मुलासोबत विवाह होणार असल्याची जिल्हाधिकाऱ्यांना लग्नपत्रिका व फो–नद्वारे माहिती दिली. त्यांनी जिल्हा महिला बाल विकास समिती अधिकारी आणि दामिनी पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. रविवारी (दि.२) सकाळी १० वाजता पथकाने धाव घेत अक्षदा पडण्यापूर्वीच विवाह रोखला. घरची परिस्थिती बेताची असल्याने आणि वडील दारूच्या आहारी गेल्याने नातेवाईकांनी मुलीचा विवाह लावून देण्याची तयारी केली असल्याचे समोर आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हमालवाडा येथे मोठ्या थाटामाटात लग्नाची तयारी करण्यात आली होती. रस्त्यालगत मंडप, सजावट आणि स्टेज उभारण्यात आले होते. दामिनी पथकाने परिसरात साध्या वेशात गस्त घालून माहिती गोळा केली. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना कळविले की, लग्न दुपारी १२.३० वाजता होणार आहे. यानंतर पथकाने लग्नमंडपात अचानक धाड टाकली. तेथे नवरीसह उपस्थित मंडळींची चौकशी केली.

महिला बाल विकास अधिकाऱ्यांनी व दामिनी पथकाने दस्तऐवज तपासले असता, मुलीचे वय १६ वर्षे असल्याचे स्पष्ट झाले, तर नवरदेवाचे वय २५ वर्षे होते. नगर येथून व–हाडी मंडळी दाखल झाले होते. जेवणाची तयारी सुरु होती. मंडपात हळद झालेली होती. दोन तासांत अक्षदा पडणारच होत्या. शिकण्याच्या वयात संसाराची दोरी हाती देण्याचा प्रयत्न पोलिसांनी उधळून लावला.

नवरी ही शहागडजवळील एका कारखान्याजवळ राहणारी असून, सध्या १२ वी मध्ये शिकते. तिच्या आईचे माहेर हमालवाडा येथे आहे. मुलीचे वडील दारूच्या आहारी गेले असल्याने कुटुंबीयांनी लवकर लग्न लावण्याचा निर्णय घेतला होता. काका, मावशी, मामा यांनी जेवण, भांडी, मंडप असा सर्व खर्च उचलला होता. नवरदेव शिर्डी परिसरातील असून, तो चहा टपरी चालवतो. मुलीची दामिनी पथकाने विचारपूस करताच ती ढसाढसा



रडू लागली. मला शिकायचे होते पण घरच्या परिस्थतीमुळे लग्नास तयार झाल्याचे सांगून भावनांना वाट मोकळी करून दिली.

नवरीचा मेकअप सुरु असतानाच पथक धडकले. दामिनी पथकातील हेड कॉन्स्टेबल अनिता शिंदे, निर्मला निंभोरे, पुजा जाधव, आनंद वाघ, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी विघ्ने, आम्रपाली बोर्डे, नितेश, सातारा ठाण्याचे एएसआय पांडे, अंमलदार सुनिता हाके, गिता ढाकणे यांनी विवाह रोखला. नातेवाईकांना बालविवाह कायद्याची माहिती देऊन समज दिली. मात्र, नवरदेवाला नातेवाईकांनी तेथून काढून दिले होते.

# महीला डॉक्टरला न्याय मिळवून देण्यासाठी महीला काँग्रेसची श्रद्धांजली कार्यक्रमात मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार, शहरजिल्हा महिला काँग्रेस कमिटी पूर्व विधानसभा प्रभाग क्रमांक २३, शहरजिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या महासचिव वंदनाताई जगताप यांच्या नेतृत्वात,व शहरजिल्हा महिला काँग्रेस कमिटी अध्यक्ष दिपाली लालाजी मिसाळ

यांच्या व इतर पक्ष महिला व पुरुष पदाधिकारी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ, पुंडलिक नगर येथे सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने




उप पोलिस निरीक्षक यांनी केलेल्या लैंगिक अत्याचारामुळे आत्महत्या केल्याचे त्यांच्या सुसाइड नोटमधून उघड झाले आहे. या घटनेने संपूर्ण समाज हादरला असून, वैद्यकीय क्षेत्रातील महिला अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पीडित महीला डॉक्टरला न्याय मिळावा अशी मागणी करत मेणबत्ती लावून श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते इब्राहिम पठाण, बबन डिडोरे, डॉ. पवन डोंगरे ,बाबुराव कवसकर, अजय दिंडोरे ,इम्रान पठाण , सागर नागरे, मयूर गायकवाड, अनुराग दाभाडे, रवी लोखंडे, इरफान पठाण, उत्तम दणके, मोईन कुरेशी, रईस शेख, शांतीलाल पवार, प्रविण केदार, योगेश थोरात, सुफीयान पठाण, शाहूराज कांबळे काका, रुबीना सय्यद ,मंजू लोखंडे, सलमा नाहीद, शहिदां खान, रेखा निकाळजे, नंदा पवार, लता अक्षय, वैशाली गोवर, ज्योती सदाशिव, नेहा पवार ,वंदना जगताप ,सोनाली काकडे ,मयुरी काकडे, मंगल सातपुते आदींची उपस्थिती होती.

## लोकशाही दिनी २५ अर्ज

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (जिमाका) जिल्हास्तरीय लोकशाही दिन आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत करण्यात आला. यावेळी नागरिकांकडून २५तक्रारी अर्ज प्राप्त झाले. विभागनिहाय प्राप्त अर्ज याप्रमाणे – महसूल विभाग–२, अन्य निवेदने – २३ असे एकूण २५ अर्ज प्राप्त झाले असे सामान्य शाखेच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती संगिता राठोड यांनी कळविले आहे.

# सिल्लोडमध्ये ‘वॉकथॉन’ ; फॉरेस्टमध्ये वृक्षारोपण

आमठाणा दि.३ (प्रतिनिधी)– भारताचे पोलादी पुरुष, राष्ट्रपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त शासनाच्या निर्देशानुसार २३ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान ‘राष्ट्रीय एकता सप्ताह’ साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा एक भाग म्हणून सिल्लोड शहरात पाच किलोमीटर अंतराची ‘वॉकथॉन’ (पायी चालणे) मोहीम उत्साहात पार पडली. हा कार्यक्रम भराडी नाका, सिल्लोड ते मोडा फाटा या मार्गावर पार पडला. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शेषराव उदार तसेच सिल्लोड ग्रामीण ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम यशस्वीपणे पार पडला.



वॉकथॉनमध्ये मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी आणि पोलिस कर्मचारी सहभागी झाले. देशाच्या अखंडतेचा आणि एकतेचा संदेश देत सहभागींनी ‘‘एक भारत, श्रेष्ठ भारत’’ अशा घोषणा दिल्या. देशभक्तीच्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली

यानंतर आमठाणा फॉरेस्ट मध्ये विविध जातींचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे , बीट जमादार अनंत जोशी , पोलीस जमादार सचिन काळे , ज्ञानदेव ढाकणे , पंडित फुले ,आमठाणा ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य माजी सभापती डॉ. संजय जामकर रामजी खरात व ग्रामपंचायत कर्मचारी तसेच पोलीस पाटील केळगाव बाळासाहेब इवरे पेंडगाव पोलीस पाटील हरिदास शिंदे आमठाणा पोलीस पाटील शरद वाघ मनोज दाणेकर उपस्थित होते.




# भाजपाची महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी बैठकीचा धडाका

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)– आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी गारखेडा मंडळामार्फत प्रभाग क्रमांक २२ मध्ये निवडणूक तयारीचा आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत मंडळातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकीसाठी नियोजन, संघटनात्मक बांधणी आणि प्रचार रणनीती संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीस मार्गदर्शन मंत्री अतुलजी सावे, खा. भागवत कराड, शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे, बैठकीत पक्षाच्या निवडणूक तयारीचा आढावा घेऊन कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला प्रचंड बहुमताने विजय मिळवून देण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. भाजपाच्या निवडणूक तयारी बैठकींना संपूर्ण शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रत्येक मंडळात अशा नियोजन बैठका आयोजित करण्यात येत आहेत.

यावेळी उपस्थित होते शहर सरचिटणीस ताराचंद गायकवाड, गारखेडा मंडळ अध्यक्ष संजय बोराडे, गोविंद केंद्रे, लक्ष्मण थेटे , कैलास गायकवाड, निरपगार, युवा मोर्चा अध्यक्ष राहुल दांडगे, सुवर्णा तुपे, आरती गुटळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.



# युवकांनी व्यवसायाकडे वळणे काळाची गरज–माजी सभापती पदमाबाई जिवरग

टाकळी जिवरग दि.३ (प्रतिनिधी)– टाकळी जिवरग युवकांनी नोकरीसोबतच व्यवसायाचा पर्याय ठेवला पाहिजे. नोकरी करण्यापेक्षा इतरांना नोकरी देणारे उद्योग, व्यवसायाकडे वळा, असे आवाहन फुलंब्री पंचायत समितीच्या माजी सभापती पदमाबाई जिवरग यांनी केले. हर्सूल परिसरातील स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पदमाबाई जिवरग, उद्योजक पांडुरंग जिवरग, डॉ. विठ्ठल जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमास उपस्थित तरुणांना आवाहन करताना माजी सभापती जिवरग पुढे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील तरुण आज शहरात येऊन व्यवसाय सुरू करतात, ही अभिमानाची बाब आहे. यावेळी पाहुण्यांचे स्वागत विशाल जिवरग, संतोष जिवरग यांनी केले. कार्यक्रमास डॉ. विठ्ठल जाधव, सेवानिवृत्त पर्यवेक्षक कडुबा वहाटुळे, पंडित जिवरग, माजी सरपंच द्वाकरकाबाई जिवरग, रामराव जिवरग, अप्पा पाटील फुके, मधुकर फुके, आप्पा फुके, आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

# ९५ बालकांना कुपोषणामधून बाहेर काढणार, सिल्लोड तालुक्यासाठी उपाययोजना आणि क्रियाकलापांची साखळी केली तयार

सिल्लोड दि.३ (प्रतिनिधी)– जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून १४ नोव्हेंबरपर्यंत कुपोषणमुक्त जिल्हा विशेष अभियान राबवले जात आहे. याअंतर्गत पंचायत समिती सभागृहात गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या अध्यक्षतेखाली सिल्लोड तालुक्याचा आढावा घेण्यात आला. पुढील नियोजन, उपाययोजना, कृती आराखडा आणि रोड मॅप ठरवण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६५१ तीव्र कुपोषित बालके आहेत. त्यापैकी सिल्लोड तालुक्यात ९५ बालके आहेत. या बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना आणि क्रियाकलापांची साखळी तयार करण्यात आली आहे. शनिवारी ग्रामस्तरीय सर्व शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी कुपोषित बालकांच्या घरी आणि अंगणवाडीत जाऊन तपासणी केली. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथक, अंगणवाडी कर्मचारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक यांनी तपासणी, औषधोपचार आणि समुपदेशन केले.



ग्रामविकास अधिकाऱ्यांनी गावनिहाय तीव्र कुपोषित बालके दत्तक घेतली आहेत. या बालकांना दररोज प्रथिनेयुक्त आहार देण्याची जबाबदारी घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या आहारात रोज बदल : आरोग्य अधिकारी अंडी, केळी, मटकी, उसळ, उपमा, गूळ–शेंगदाणा लाडू, लापसी, शेवग्याच्या शेंगांचे सूप, सफरचंद, डाळिंब, पपई, बीट, पराठा, पोळी–भाजी, वरणभात, खिचडी असा सकस आहार रोज बदलून दिला जात आहे. ही माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नासेर खान पठाण यांनी दिली.

# शिर्डी औद्योगिक वसाहतीत स्थानिक युवकांना रोजगारास प्राधान्य–उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत

## शिर्डी एमआयडीसीत ३ हजार स्थानिक युवकांना रोजगार–पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर दि.३ (प्रतिनिधी)– शिर्डी औद्योगिक वसाहतीतील ६०० एकर परिसरात भविष्यात विविध उद्योग उभारले जाणार असून, या उद्योगांच्या स्थापनेदरम्यान कायदा–सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ नयेत, यासाठी उद्योजकांनी रोजगार देताना किमान ८० टक्के स्थानिक युवकांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले. शिर्डी औद्योगिक वसाहतीतील श्री सदगुरू नारायणगिरी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि टाटा टेक्नॉलॉजी संचलित कौशल्यवर्धन केंद्राच्या भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजयराव मुळीक, एमआयडीसीचे प्रादेशिक व्यवस्थापक गणेश राठोड, उपविभागीय अधिकारी माणिक आहिरे, टाटा टेक्नॉलॉजीचे सुशीलकुमार, टाटा कन्सल्टन्सीचे समन्वयक प्रितम गांजेवार, राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, तसेच कैलास कोते, अभय शेळके आदी उपस्थित होते.

उद्योगमंत्री डॉ. सामंत म्हणाले की, राज्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यासाठी दिवंगत रतन टाटा यांच्याकडे ५० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यावर त्यांनी तब्बल ८०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले. या निधीतून शिर्डी औद्योगिक वसाहतीत कौशल्यवर्धन केंद्र उभारले जात आहे. हे केंद्र स्थानिक युवकांच्या कौशल्य वृद्धीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, या परिसराचा औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

राज्य शासनाने औद्योगिक विकासासाठी शिर्डीत ६०० एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. आज महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत



देशात पहिल्या क्रमांकावर असून, उद्योजकांना सक्षम बनविण्याचे कार्य शासनाने केले आहे. दावोस येथे १५ लाख कोटी रुपयांचे औद्योगिक करार करण्यात आले असून, त्यापैकी ८० करारांची अंमलबजावणी झाली आहे.

आज गडचिरोली जिल्हा नक्षलवादासाठी नव्हे तर उद्योगनगरी म्हणून ओळखला जात आहे. येथे एक लाख कोटी रुपयांचे नवीन स्टील उद्योग उभे राहत आहेत. शासनाने उद्योग परवानग्या मिळविण्याची प्रक्रिया सुलभ केली असून, 'मैत्री पोर्टल' वर अर्ज केल्यास नवीन उद्योगांना ३० दिवसांच्या आत सर्व विभागांची मान्यता मिळते.

मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या जेम्स अँड ज्वेलरी पार्क उद्योगांसाठी रत्नागिरी येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून अनेक तरुणांना ज्वेलरी उद्योगात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिर्डीतही जेम्स अँड ज्वेलरी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. सामंत यांनी दिली.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, शिर्डी एमआयडीसीसाठी सावळी विहीर येथील शेती महामंडळाची ५०० एकर जमीन शासनाने मोफत उपलब्ध करून दिली आहे. सावळी विहीर पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी ४०० कोटी रुपये, तसेच शिर्डी अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि बहुउद्देशीय सभागृहासाठी १०० कोटी रुपये शासनाने मंजूर केले आहेत. शिर्डी एमआयडीसीत संरक्षण उद्योगांसाठी २०० एकर जागा राखीव ठेवण्यात आली असून, यामुळे सुमारे ३ हजार स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

साईबाबा संस्थानच्या ५० कोटी रुपयांच्या निधीतून उभारलेल्या शिर्डी विमानतळाचा विस्तार सध्या सुरू आहे. या विस्तारासाठी शासनाने ६०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. विमानतळामुळे शिर्डी परिसराच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळाली आहे. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विकास विभाग उत्कृष्ट कार्य करीत आहे. या केंद्रातून दरवर्षी ७ हजार कामगारांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. संरक्षण कारखान्यासाठी १०५२ प्रशिक्षित युवकांची गरज असून, त्यापैकी ५०० आयटीआय शिक्षित तरुणांची आवश्यकता आहे. पुढील दहा वर्षांत कौशल्य आणि तांत्रिक शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे, असे मंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले. प्रास्ताविक डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

**काय आहे कौशल्यवर्धन केंद्र**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि टाटा टेक्नॉलॉजी यांच्या सहकार्याने उभारण्यात येणाऱ्या या कौशल्यवर्धन केंद्रात शिर्डी औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक मनुष्यबळाला आधुनिक प्रशिक्षण दिले जाणार आहे.

एमआयडीसीकडून १ एकर जागा देण्यात आली असून, तेथे २१ हजार ५०० चौरस फूट क्षेत्रफळाची अत्याधुनिक इमारत उभारली जाणार आहे. या बांधकामासाठी १९६ कोटी २८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, यापैकी १६५ कोटी १० लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजीकडून आणि ३१ कोटी १८ लाख रुपये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून दिले जाणार आहेत.

या केंद्रामुळे स्थानिक युवकांना प्रशिक्षणाद्वारे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि शिर्डी परिसराचा औद्योगिक तसेच आर्थिक विकास वेग घेईल.

**नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सुसज्ज इमारत साकार होणार**

सध्या राहाता येथे खासगी इमारतीत कार्यरत असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी शासनाने सावळी विहीर येथील शिर्डी औद्योगिक वसाहतीत २ एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. या ठिकाणी आयटीआय आणि कार्यशाळेची सुसज्ज इमारत उभारण्यासाठी शासनाने साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामुळे संस्थेतील व्यवसाय शाखांची संख्या एकवरून चारपर्यंत वाढणार असून, विद्यार्थ्यांची क्षमता २४ वरून १४४ पर्यंत वाढेल.

# पालघर जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या कामास गती देण्यासाठी वॉररुममध्ये हा प्रकल्प घ्यावा–पालकमंत्री गणेश नाईक



मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– पालघरमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्याच्या परिसरातील निवासस्थानांचे काम लवकरात लवकर पूर्ण यासाठी हा प्रकल्प मुख्यमंत्री वॉर रुममध्ये घेण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश वन मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

पालघर जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय, सफाळे येथील ग्रामीण रुग्णालय, मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटर व पालघरमधील परिचर्या महाविद्यासंदर्भात कामाचा आढावा मंत्री नाईक यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वसई विरार महापालिकेचे आयुक्त मनोज सुर्यवंशी, पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री नाईक म्हणाले की, पालघर जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारत बांधकामाचा वाढीव खर्चाच्या निधीसाठी पाठपुरावा करण्यात यावा. आदिवासी भागातील बांधवांसाठी हे रुग्णालय उपयुक्त असल्याने तो लवकर पूर्ण करून सुरू करण्यासाठी त्याचा समावेश मुख्यमंत्री वॉररुम प्रकल्पांमध्ये करण्यात यावा. यासाठी आवश्यक तो प्रस्ताव तातडीने सादर करावा.

सफाळे येथील ग्रामीण रुग्णालय व मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामासाठी आवश्यक तो निधी मिळविण्यात येईल. मात्र, तोपर्यंत उपलब्ध असलेल्या निधीतून काम सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

# उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात आता विनामूल्य डायलिसिस सुविधा

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन

यवतमाळ दि.३ (प्रतिनिधी)– यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे उमरखेड येथील ८ खाटांच्या मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

यामुळे उमरखेड आणि लगतच्या परिसरातील किडनी (मूत्रपिंड) आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध होणार असल्याने दिलासा मिळेल, असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.

उमरखेड तालुक्यात कार्यरत असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात हे अत्याधुनिक डायलिसिस सेंटर स्थापन करण्यात आले आहे. परिसरातील रुग्णांची वाढती संख्या आणि उपचारांची गरज लक्षात घेऊन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात




आला आहे.

यावेळी बोलताना पालकमंत्री श्री. राठोड म्हणाले की, "या मोफत डायलिसिस सेंटरमुळे उमरखेड परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुलभ होणार आहे. आतापर्यंत रुग्णांना उपचारांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या शहरांमध्ये जावे लागत होते, ज्यामुळे त्यांना प्रवासाचा मोठा ताण सहन करावा लागत होता आणि उपचारांवरील आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. आता हे मोफत केंद्र सुरू झाल्यामुळे नागरिकांचा हा त्रास दूर होईल आणि त्यांना वेळेवर व सोयीस्कर मोफत उपचार मिळतील."

याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. विकास मीना, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व परिचारिका उपस्थित होत्या. तसेच, उमरखेड येथे आमदार श्री. किसन वानखेडे, भाजपचे जिल्हा समन्वयक श्री. नितिन भुतडा, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मांडण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. डोंगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शिंदे, श्री. चिंतंगराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

# आरोग्य क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्यास प्राधान्य–उपमुख्यमंत्री अजित पवार

## औंध येथे बहुउद्देशीय दंत रुग्णालय, संशोधन केंद्र स्थापनेबाबत सामंजस्य करार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– कोरोनाच्या काळात आपल्याला आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, तेथील पायाभूत सुविधांचे महत्त्व लक्षात आले. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय तसेच त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यास राज्य शासनाने प्राधान्य दिले असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत इंडियन डेंटल असोसिएशन, पुणे जिल्हा परिषद आणि जिल्हा शासकीय रुग्णालय, औंध यांच्यात औंध येथे बहुउद्देशीय दंत रुग्णालय आणि संशोधन केंद्र स्थापनेबाबत सामंजस्य करार करण्यात आला.




यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शुभ्रा नंदी, डेंटल असोसिएशनचे सचिव डॉ.अशोक ढोबळे, उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव डॉ.संतोष भोसले उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, हा सामंजस्य करार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य सेवेतील नवा अध्याय आहे. या केंद्राच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात दंत विषयक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील. आरोग्य म्हणजे केवळ कोणत्याही आजारावर उपचार नसून प्रतिबंध, जनजागृती, शिक्षण आणि सेवा या चार घटकांचा योग्य समन्वय आहे. या केंद्राच्या स्थापनेतून हे ध्येय साध्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए) ही संस्था देशभरातल्या दंतवैद्यांच्या सशक्त नेटवर्कमुळे अगदी गावखेड्यात दातांच्या आरोग्याविषयी जागृती करत आहे, असे सांगत उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी डेंटल असोसिएशनच्या कार्याचे कौतुक केले.

# वसई विरार महापालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणास गती द्या–पालकमंत्री गणेश नाईक

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– वसई विरार महापालिका क्षेत्रातील १३ मुख्य रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामास मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने गती द्यावी, असे निर्देश वन मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

कामास मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) वसई विरार महापालिका हद्दीत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पासंदर्भात मंत्री नाईक यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला. यावेळी एमएमआरडीएचे सहआयुक्त ए.के. पांडे, वसई विरार महापालिकेचे आयुक्त मनोज सुर्यवंशी, पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, एमएमआरडीएचे मुख्य अभियंता यतिन साखळकर, महापालिकेचे कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे आदी उपस्थित होते.

वसई विरार महापालिका क्षेत्रात एमएमआरडीएमार्फत तेरा मुख्य रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे काम करण्यात येत आहे. सिमेंटच्या रस्त्यामुळे नागरिकांचा प्रवास सुलभ व जलदगतीने होणार आहे. त्यामुळे या कामास प्राधान्य देऊन लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे. तसेच महापालिका क्षेत्रातील उड्डाणपुलांची कामेही वेगाने करावी्यात, अशा सूचना मंत्री नाईक यांनी यावेळी दिल्या.

तसेच विरार, विराट नगर, ओस्वालनगरी नालासोपारा, अलकापुरी, उमेळमान या ठिकाणी रेल्वे उड्डाणपुलाचे नियोजन आहे. या रेल्वे उड्डाणपुलाचे काम एमएमआरडीएने लवकर सुरू करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

# 'सर्वाइकल कॅन्सर फ्री पुणे' अभियानाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुभारंभ

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'सर्वाइकल कॅन्सर फ्री पुणे' अभियानाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव डॉ.संतोष भोसले, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, जीविका फाउंडेशन, युनियन बँक, अमेरिका इंडिया फाउंडेशन या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

स्त्रियांमध्ये होणारा सर्वाइकल कॅन्सर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठ्या प्रमाणात आढळून येणारा आजार आहे. एचपीव्ही लस आणि वेळेवर केलेल्या स्क्रीनिंगमुळे या आजाराला प्रभावीपणे प्रतिबंध करता येऊ शकतो. त्यामुळे या आजाराच्या बाबतीत महिलांमध्ये जनजागृती करणे आणि लसीकरणाचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यावेळी अभियानासंदर्भात सादरीकरण केले. या प्रकल्पाचा उद्देश सर्वाइकल कॅन्सरच्या संदर्भात प्रतिबंध,जनजागृती, लसीकरण आणि समायोजित स्क्रीनिंगच्या माध्यमातून कॅन्सरचं संपूर्णपणे निर्मूलन करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये लसीकरणाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आशा सेविकांकडून घराघरात जाऊन महिला वर्गासाठी सर्वाइकल कॅन्सर स्क्रीनिंगची माहिती दिली जाणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# दिव्यांगांच्या हक्कांच्या प्रभावी संरक्षणासाठी दिव्यांग कल्याण आयुक्तांची कार्यपद्धती निश्चित, सचिव तुकाराम मुंढे यांची माहिती

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)– दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, हक्क, सुरक्षा आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ७९ ते ८३ नुसार आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना 'राज्य आयुक्त' म्हणून अधिसूचित करण्यात आले असून, त्यांना न्यायालयीन अधिकार बहाल करण्यात आले आहेत. राज्य आयुक्तांच्या चौकशी, तपासणी आणि कार्यवाही प्रक्रियेला अधिक सुसूत्र आणि परिणामकारक करण्यासाठी मानक कार्यपद्धती तयार करण्यात आली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, राज्य आयुक्त स्वतःहून किंवा प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करू शकतात. दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही किंवा निर्देश देण्याचा अधिकार त्यांना आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम च्या कलम ८२ नुसार, राज्य आयुक्तांना दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. यामध्ये साक्षीदारांना समन्स पाठविणे, कागदपत्रे सादर करणे, शपथपत्रावर पुरावे स्वीकारणे तसेच तपासणीसाठी आयोग नेमण्याचे अधिकार समाविष्ट आहेत. त्यामुळे राज्य आयुक्तांसमोरील प्रत्येक कार्यवाही न्यायिक स्वरूपाची मानली जाईल.

राज्य आयुक्तांकडे दिव्यांग व्यक्ती, त्यांचे पालक किंवा कायदेशीर प्रतिनिधी तक्रार दाखल करू शकतात. तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादीस नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मागवले जाईल. प्रतिवादीने १५ दिवसांत उत्तर सादर करावे लागेल, त्यानंतर ३० दिवसांत सुनावणी पूर्ण केली जाईल. सुनावणीसाठी दोन्ही पक्ष उपस्थित राहतील. सुनावणीसाठी प्रतिवादी उपस्थित राहिला नाही तर आयुक्तांना एकतर्फी निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

राज्य आयुक्तांच्या शिफारशींवर संबंधित प्राधिकरणाने कार्यवाही करणे बंधनकारक आहे. शिफारशीवर केलेली कार्यवाही किंवा कारणासहित नकार अहवाल ९० दिवसांत राज्य आयुक्तांकडे सादर करावा लागेल. एखाद्या प्राधिकरणाने राज्य आयुक्तांची शिफारस नाकारल्यास आणि जर नकाराची कारणमीमांसा योग्य नसल्याचे आढळले, तर राज्य आयुक्त शासनाकडे अहवाल सादर करतील.

राज्य आयुक्तांनी मागितलेली आवश्यक माहिती व अनुपालन अहवाल सर्व अधिकारी, प्राधिकरी यांना सादर करणे बंधनकारक असेल. राज्य आयुक्तांच्या निर्देशांचे पालन न केल्यास, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ आणि कलम ९३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. त्यानंतर सुद्धा राज्य आयुक्तांच्या निर्देशाचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी, प्राधिकारी यांच्याविरुद्ध प्रशासकीय तसेच शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्यात येईल.

**दैनिक गोकुळनिती** हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अर्पण कमलकिशोर गोयल यांनी कल्पतरु ऑफसेट, प्लॉट नं. डी. ३०, अतिरिक्त औद्योगिक वसाहत टप्पा क्र.१, जालना ४३१ २०३ येथे छापुन, मुख्य कार्यालय दै. गोकुळनिती, प्लॉट नं. सी-२, मुर्तीजापूर म्हाडा कॉलनी ऑपोझिट धुत हॉस्पिटल जालना रोड, औरंगाबाद - ४३१००६ येथे प्रकाशित केले. मो. ९८२२५२५९५५ (या अंकात प्रकाशित झालेले मजकुर व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Printed by Arpan Kamalkishore Goyal Published by Arpan Kamalkishore Goyal on behalf of Arpan Kamalkishore Goyal (name of owner) and Printed at Kalpataru Offset, Plot No. D-30 Additional MIDC Phase -1, Industrial Area JALNA 431203 and published from Dainik Gokulniti Office, Plot No. C-2, Murtizapur Mhada Colony Opposite Dhoot Hospital Jalna Raod Aurangabad 431006 Editor : Arpan Kamalkishore Goyal, Swami Dayanand Road Near Balaji Temple, Sadar Bazar Jalna